## नाशिक औ.वि.केंद्र येथे शिवजयंती संपन्न



शिवप्रतिमेचे पूजन करताना मुख्य महाव्यवस्थापक श्री.शालिक खराबे.

नाशिक औ.वि. केंद्र, एकलहरे येथे नाशिक औष्णिक वीज केंद्रातील सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी मुख्य महाव्यवस्थापक श्री.शालीक खराबे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी महाव्यवस्थापक श्री.पी.एम. चौधरी आणि श्री.जी.एम. पचारे, अधीक्षक अभियंता श्री.पेटकर, पी.एस. चौधरी, श्री.बी.एम. मेश्राम, श्री.आर.बी. सोनटक्के, सहाय्यक संचालक (सुरक्षा), श्री.ए.एस. दराडे, कल्याण अधिकारी श्री.पी.एल. वारजुरकर, कार्यकारी अभियंता श्री.डी.यु. दामोदर, श्री.डी.जे. मोरे तसेच जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी श्री.गायकवाड, श्री.क्षीरसागर, श्री.कलंकार, श्री.एस.एस.पवार, श्री.हरिष आहेर हे उपस्थित होते.

## कोराडी येथे कामगार दिनानिमित्त गुणवंताचा सत्कार




कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, कोराडी येथे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, कामगार केंद्रातर्फे दिनांक १ मे २००९ रोजी आयोजित केलेल्या जागतिक कामगार दिनानिमित्त गुणवंत व कर्तुत्ववान कामगारांचा शाल, सत्कार करण्यात आला. याप्रसंगी खापरखेडा औ.वि. केंद्रातील श्री.राहुल बागडे, कनिष्ठ अभियंता यांनी "सेझ कामगारांकरिता तारक की मारक" या विषयांवर व्याख्यान देवून कामगारांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कोराडी औ.वि. केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री.ज्ञानेश्वर थुटूरकर, यांनी भुषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री.बी.झेड शिवणकर अधीक्षक अभियंता, समन्वय हे होते.

सदर सत्कार प्रसंगी कोराडी औ.वि. केंद्रातील कल्याण अधिकारी श्री.श्रीकृष्ण वायदंडे, कामगार कल्याण मंडळाचे कल्याण अधिकारी श्री.कापसे हे प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमास कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील कामगार नेते व वसाहतीतील कामगार वर्ग मोठया प्रमाणावर उपस्थित होते. या सत्कार समारंभाचे सुत्र संचालन व आभार प्रदर्शन केंद्र प्रमुख अशोक अहेर यांनी केले.

## खापरखेडा येथे औष्णिक विद्युत केंद्रातील राखेचा शेतीसाठी उपयोग 'शेतकरी मेळावा व चर्चासत्र'



केंद्र सरकारच्या Fly Ash Mission कार्यक्रमाअंतर्गत, खापरखेडा औ.वि.केंद्र व केंद्रीय खान व इंधन संशोधन संस्था, धनबाद (झारखंड) यांच्या संयुक्त विद्यमाने, शेतीकरिता राखेचा वापर या विषयावर चर्चासत्राचे आयोजन दिनांक २१.०२.२००९ ला ग्राम पंचायत कार्यालय, भानेगाव ता. सावनेर, जि.नागपूर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमास भानेगाव व परिसरातील शेतकऱ्यांचा भरघोस प्रतिसाद होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.मेश्राम, अधीक्षक अभियंता, औ.वि. केंद्र, खापरखेडा व प्रमुख अतिथी डॉ. श्रीवास्तव, वरिष्ठ वैज्ञानिक, तसेच श्री.सिन्हा वरिष्ठ वैज्ञानिक, इंधन संशोधन संस्था, धनबाद (झारखंड), मा.सरपंच, ग्राम पंचायत कार्यालय, भानेगाव यांची सुद्धा उपस्थिती होती.

प्रास्ताविक भाषणात श्री.सवाईतुल, कार्यकारी अभियंता, राख हाताळणी विभाग यांनी सांगितले की, खापरखेडा औ.वि. केंद्राद्वारे २००७-२००८ मध्ये जवळपास १७,६०,६३७ मेट्रीक टन एवढी राख निर्मिती झाली, पण शेतीसाठी वापरलेली राख फक्त २३५ मेट्रीक टन एवढी नगण्य आहे. या राखेचा वापर शेतीकरिता आणखी वाढावा म्हणून प्रचार, प्रसार व जनजागृतीसाठी ह्या शेतकरी मेळाव्याचे व चर्चासत्राचे आयोजन केले आहे. राखेचा वापर शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त करून त्यांच्या शेत जमिनीची मशागत करावी, तसेच महाजेनको कडून राख विनामुल्य मिळेल याची ग्वाही पण दिली.

श्री.मेश्राम, डॉ.श्रीवास्तव यांचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन लाभले, तसेच शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसन पण केले. शिवाय राख एकदाच वापरून त्याचा लाभ पुढील पांच वर्षापर्यंत कसा घेता येईल व आर्थिक दृष्टया ते कसे परवडणारे आहे, हे समजावून सांगितले व शेतकऱ्यांनी राख वापरण्यासाठी पुढे यावे व यासाठी लागणारे सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच डॉ. सिन्हा, वरिष्ठ वैज्ञानिक, इंधन संशोधन संस्था, धनबाद (झारखंड) यांनी कृषी विज्ञानावर आधारीत राखेच्या वापराने शेतीच्या उत्पादनाच्या भरघोस वाढीबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच भानेगाव येथील प्रगतीशील शेतकरी ज्यांनी आपल्या शेतांत राख वापरून उत्पादनात वाढ केली आहे, त्यांच्या शेतात प्रत्येक शेतकऱ्यांनी भेट देऊन तुलनात्मक अभ्यास करावा, या विषयी अभ्यासात्मक मार्गदर्शन केले. तसेच राख हाताळणी विभागाचे श्री.भस्मे उपकार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांनी सुद्धा राखेच्या वापरासंबंधी लागणाऱ्या सर्वतोपरी मदतीचे आश्वासन देऊन, ज्या शेतकऱ्यांनी राख वापरून उत्पादन वाढविले, त्यांचे उदाहरण देऊन मार्गदर्शनपर माहिती दिली.

या कार्यक्रमाचे संचालन श्री.काठोये, कनिष्ठ अभियंता व आभार प्रदर्शन श्री.भस्मे, उपकार्यकारी अभियंता, राख हाताळणी विभाग यांनी केले. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मा.सरपंच, ग्राम पंचायत, भानेगाव आणि राख हाताळणी विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अमुल्य सहकार्य लाभले.